**<u>उलटतपास सामनेवाला क्र.२ तर्फे वकील श्री. एस. वाय. बारटके यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

माझी जमीन संपादित करण्यापुर्वी भुसंपादन अधिका–याकडुन मला कोणतीही नोटिस आलेली नव्हती. मी संपादनाबाबत लेखी हरकत घेतली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की माझ्या अर्जातील परिच्छेद क्र.२ मधील मजकुर चुकीचा आहे. मी लेखी हरकत घेतल्याची प्रत दाखल केलेली नाही. सदर प्रत मिळाल्यास मी दाखल करेन.

२. भुसंपादनाच्या वेळेचा माझ्या जमीनीचा ७/१२ चा उतारा मी दाखल केलेला नाही. संपादित जमीन शेतजमीन होती. माझ्या आजुबाजूच्या जमीनीसुध्दा शेतजमीनी होत्या. माझ्या जमीनीच्या लगतच्या जमीनी कोणाच्या होत्या हे मला सांगता येणार नाही. संपादित केलेल्या जागेमध्ये कुठलीही झाडे नव्हती. भुसंपादनाला रुपये ५००/– प्रति चौ.मी. दर मिळावा अशी मी लेखी मागणी केली नव्हती. सर्व्हे क्र.४२, हिस्सा क्र.३पै मधील संपुर्ण जमीन संपादित केल्याबाबतचा पुरावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी जमीन संपादित झाली त्यावेळी जमीनीचा दर रुपये ५००/–प्रति चौ.मी. होता हे दाखविणारा कोणताही पुरावा भुसंपादन अधिका–यांना दिला नव्हता. मी सुरुवातीला रुपये ५००/–प्रति चौ.मी. दर मिळावा याप्रमाणेच अर्ज केला होता. त्यावेळी रुपये ५००/–प्रति चौ.मी. याप्रमाणे जमीनीचे व्यवहार झाले होते असे मला त्यावेळी व आजही कोणतेही व्यवहार आढळुन आले नाही. तसेच रुपये २०००/– प्रति चौ.मी. याप्रमाणे जमीनीचे व्यवहार झाल्याचे सुध्दा मला त्यावेळी व आजही कोणतेही व्यवहार आढळुन आले नाही. हे म्हणणे खरे आहे की रुपये ५००/– प्रति चौ.मी. किंवा रुपये २०००/– प्रति चौ.मी. याप्रमाणे केलेली मागणी कोणत्याही कागदोपत्री पुराव्याशिवाय केलेली आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की चौक–मानीवली हे गांव महामार्गालगत नाही. आजही या गावातील लोकांचा व्यवसाय शेती आहे. ज्यावेळी भुसंपादन अधिकाऱ्याने ॲवॉर्ड पारित केला त्यावेळी किंवा त्याआधी सुध्दा मी भुसंपादन अधिका–यांच्या कार्यालयात गेलो नव्हतो. भुसंपादन कायदा कलम १२(२) ची नोटीस दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर नोटीस दिनांक १५/०६/१९९७ रोजी मिळाली हे दाखविण्याकरीता माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. निशाणी क्र.१ कडील अर्ज भुसंपादन अधिका–याकडे दाखल केल्याबाबतची कोणतीही नोंद त्यावर नाही. हे म्हणणे खरे नाही की ज्यावेळी भुसंपादनाचा ॲवार्ड पारित झाला त्यावेळी माझी आई व मावशी भुसंपादन कार्यालयात हजर होत्या. हे म्हणणे खरे नाही की सदरचा अर्ज मी मुदतीत दाखल केलेला नाही.

४. सदरची जमीन ज्या गावात आहे तेथे ग्रुप ग्रामपंचायत आहे. भुसंपादनाच्या पुर्वीपर्यंत कधीही आमच्या गावातुन रेल्वे जात नव्हती. चौक–मानीवली या गावात एसटी डेपो नाही. त्यावेळी गावामध्ये डाक कार्यालय, शासकिय दवाखाना, बँक नव्हते. माझ्या जमीनीत जाण्यासाठी दुस–याच्या जमीनीच्या केलेल्या बांधावरुन जावे लागत होते. रेल्वे चौक–मानीवली या गावात थांबत नाही. साक्षीदार स्वतः सागंते की चौक येथे रेल्वेस्थानक आहे. चौक–मानीवली गावात २००० ते २५०० लोक राहतात. सदर गावात मोठे कारखाने, इमारती, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, महाविदयालय नाहीत. सन १९९५ मध्ये चौक– मानीवली गावात रुपये ५००/– प्रति चौ.मी. किंवा रुपये २०००/– प्रति चौ.मी. याप्रमाणे जमीनीचे व्यवहार झाले याबाबतचे पुरावे दुय्यम निबंधक कार्यालयातुन आणु शकत नाही.

५. माझ्या गावापासुन माथेरान २० किमी, पनवेल १५ किमी, खोपोली १० किमी, रसायनी ८ किमी व पाताळगंगा १० किमी अंतरावर

आहेत. खोपोली, पाताळगंगा व रसायनी येथील औदयोगिक व्यवसाय अंदाजे सन १९६० पासुन सुरु आहेत. माथेरान इंग्रजांच्या काळापासुन अस्तित्वात आहे. हे म्हणणे खरे आहे की या गावाप्रमाणे माझ्या गावाचा विकास झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे आमच्या गावात जमीन खरेदी विक्रीचे व्यवहार होत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की मी मागणी केलेली रुपये २०००/– प्रति चौ.मी. अवास्तव आहे.

६. चौक–मानीवली येथे जिल्हा परिषदेची शाळा नाही. या गावातील मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळेत जायचे असल्यास चौक, खोपोली, पनवेल किंवा कर्जत येथे जावे लागते. आमच्या गावातुन इतर ठिकाणी जायचे असल्यास चौक येथील बसस्थानकात यावे लागते. चौक–मानीवली गावात बस येत नाही. सन १९९५ मध्ये पाण्याच्या टाक्या किंवा पाण्याची स्वतंत्र व्यवस्था नव्हती. महड गावात सुध्दा कोणत्याही सुविधा नाहीत. साजगांव येथे सुध्दा कोणताही विकास झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की मध्य रेल्वेकडुन विनाकारण वाढीव नुकसानभरपाई मागितलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

**(ए.एस. बडगुजर)**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल

पनवेल
दिनांक : २९/०१/२०२६.